**<u>ठळक बातम्या</u>**

- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून आदरांजली, देशभरातून आंबेडकरी अनुयायी मुंबईत चैत्यभूमीवर दाखल

- आयकर प्रणाली सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारचे प्रयत्न सुरू असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आजही इंडिगोची ४०० हून अधिक उड्डाणं रद्द

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यानच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा नाणेफेक जिंकून क्षेत्ररणाचा निर्णय

**<><><><><>**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना ७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही बाबासाहेबांना आदरांजली वाहिली आहे. संसद भवनात आज लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्यासह संसद सदस्यांनी बाबासाहेबांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

बाबासाहेबांचं दूरदृष्टी असलेलं नेतृत्व न्याय, समता आणि संविधानाच्या तत्वांवरची त्यांची निष्ठा भारताच्या वाटचालीत महत्त्वाची ठरली आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि गृहमंत्री अमित शहा यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज सकाळी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी मुंबईत चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. इंदू मिलचा जागेवर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं काम पुढच्या सहा डिसेंबरच्या आत पूर्ण करण्याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. राज्याच्या प्रगतीत आणि राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षेतही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या योगदानामुळे आज देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण होत असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केलं. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही चैत्यभूमीवर जाऊन बाबासाहेबांना अभिवादन केलं.

पहाटेपासूनच मुंबईत चैत्यभूमीवर मोठी रांग लागली असून शांततेने आंबेडकरी अनुयायी अभिवादन करीत आहेत. मुंबई महापालिकेनं चैत्यभूमी आणि परिसरात विविध सुविधा पुरवल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात समता सैनिक दलाचे जवान आणि पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला आहे. देशभरातून आंबेडकरी अनुयायी चैत्यभूमीवर दाखल होत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान असलेल्या राजगृह परिसरातही अनुयायी मोठ्या प्रमाणात भेट देत असून त्यांच्यासाठीही पुरेशा व्यवस्था केल्या आहेत. देशाच्या विविध भागातून येणाऱ्या अनुयायांसाठी चैत्यभूमी परिसरात १ लाख चौरस फूटाचा भव्य तंबू उभारण्यात आला असून त्यात चैत्यभूमीचे थेट प्रक्षेपण करणाऱ्या १० एलईडी स्क्रीनही लावण्यात आल्या आहेत. फिरती स्वच्छतागृहे, स्नानगृहे, रुग्णवाहिका आदी व्यवस्थाही करण्यात आली असून विविध ठिकाणी आरोग्य तपासणी केंद्रही स्थापन करण्यात आली असून ५८५ वैद्यकीय कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. मध्य रेल्वेनंही नागपूर, अमरावती, कलबुर्गी आणि कोल्हापूर येथून विशेष अनारक्षित रेल्वेगाड्या सोडल्या असून कल्याण ते परळ उपनगरी रेल्वेच्या १२ अतिरीक्त फेऱ्याही चालवल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

केंद्र सरकार आयकर प्रणाली सुलभ करण्यासाठी काम करत असून यापुढे ती किचकट राहणार नाही, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत एका खासगी माध्यम संस्थेच्या कार्यक्रमाला त्या आज संबोधित करत होत्या. नागरिकांच्या प्रगतीसाठी आयकर स्लॅब पारदर्शी आणि सुलभ करणं आवश्यक असून

सीमाशुल्क चौकटीत फेरबदल करणं हा याचा पुढचा टप्पा आहे, असं त्या म्हणाल्या. गेल्या दोन वर्षांत सीमाशुल्क कमी करण्यात आल्याचं सीतारामन यानी अधोरेखित केलं. मध्यमवर्गीयांची बचत कमी होत नसून ती गुंतवणुकीत परावर्तीत झाली आहे, असंही त्या म्हणाल्या.

<><><><><>

न्यायालयीन प्रक्रियेत एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याबाबत जपून पावलं टाकली जात असून अशा प्रकारचं कोणतंही तंत्रज्ञान न्यायालयीन निर्णय प्रक्रियेची जागा घेऊ शकत नाही असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. न्यायालयीन प्रक्रियेत एआय आणि मशिन लर्निंगचं नियमन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू होती, तेव्हा ही टिप्पणी करण्यात आली. तंत्रज्ञानाच्या बाबतीत न्यायव्यवस्था सावध आहे, न्यायालयीन निर्णय प्रक्रियेला नियंत्रित करण्याची परवानगी एआयला दिली जाणार नाही, असं न्यायमूर्ती सूर्य कांत म्हणाले. न्यायाधीशांचं स्वातंत्र्य आणि मानवी विवेकबुद्धीचं भारतीय न्यायव्यवस्थेतलं स्थान अबाधित राहील असं सूर्यकांत यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन काल आपल्या भारत भेटीची सांगता करून पालम विमानतळावरून रशियाला रवाना झाले. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी त्यांना निरोप दिला. २३ व्या भारत रशिया वार्षिक परिषदेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून पुतीन यांचं ४ डिसेंबरला नवी दिल्लीत आगमन झालं होतं.

<><><><><>

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आज शनिवारीसुद्धा इंडिगोची ४०० हुन अधिक उड्डाणं रद्द झाल्याची माहिती वृत्तसंस्थेनं दिली आहे. यापैकी बंगळुरू विमानतळावर १२४, मुंबई विमानतळावर १०९ तर पुणे विमानतळावरच्या ४२ विमानसेवा आज रद्द झाल्या आहेत.

मात्र, विमानउड्डाणांच्या वेळांमधली दिरंगाई तसंच विमानं रद्द होणं आटोक्यात आलं असून विमानतळांवर आता दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागणार नसल्याचं नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत

होते. लहान मुलं, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना प्रवासात प्राधान्य देण्यासाठी नागरी हवाई वाहतूक मंत्रालय विमानतळांवर कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, नागरी हवाई वाहतूक मंत्रालय तसंच विमानसेवा नियंत्रकांनी न्यायालयाच्या आदेशाचं कसोशीनं पालन करावं आणि वैमानिक आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावं असं आवाहन वैमानिक संघटनेनं केलं आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणासाठी आतापर्यंत २ कोटी ८ लाख ४६ हजार अर्जांचं डिजीटायजेशन पूर्ण झालं आहे. त्यामुळे प्राप्त झालेल्या एकूण अर्जांपैकी ९८ टक्क्यांहून अधिक अर्ज स्वीकारले गेले आहेत. बुथ स्तरावरचे कर्मचारी आणि अधिकारी छत्तीसगडच्या अनेक दुर्गम आणि आदिवासीबहूल भागातल्या मतदारांशी संपर्क साधत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या अभिनव उपक्रमाच्या ९व्या आवृत्तीच्या पार्श्वभूमीवर मायगव्ह - या पोर्टलवर देशव्यापी स्पर्धा सुरु आहे. ऑनलाईन बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित ही स्पर्धा ११ जानेवारीपर्यंत खुली राहणार आहे. इयत्ता ६ ते १२ वी पर्यंतचे विदयार्थी तसंच पालक आणि शिक्षक या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या सहभागींना प्रमाणपत्र दिलं जाणार आहे.

परीक्षा पे चर्चा हा कार्यक्रम जानेवारी २०२६ मध्ये आयोजित केला जाणार आहे. या कार्यक्रमात भारतातले तसंच परदेशातले विद्यार्थी, पालक आणि शिक्षक परीक्षेमुळे येणाऱ्या तणावावर प्रधानमंत्र्यांशी संवाद चर्चा करतील. २०२५ मध्ये परीक्षा पे चर्चा कार्यक्रमानं २४५ हून अधिक देशातल्या विदयार्थ्यांच्या सहभागाचा जागतिक विक्रम नोंदवला आहे.

<><><><><>

रशियाच्या तेल निर्याती संबंधित पश्चिमी सागरी सेवांवर पूर्णपणे बंदी घालण्यासाठी सात देशांच्या गटाने आणि युरोपीय संघाने चर्चा सुरू केली आह. याचा उद्देश युक्रेन विरोधात सुरू असलेल्या युद्धाला पुरवल्या जाणाऱ्या निधीला पायबंद घालणं हा आहे. सध्या रशियातून एक तृतीयांशहून अधिक तेल पश्चिमी टँकर्सच्या सहाय्याने भारत आणि

चीनमध्ये निर्यात केलं जातं. वर्ष २०२६ च्या सुरुवातीला युरोपीय संघाच्या पुढच्या मंजूरी पॅकेजमध्ये याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह बँक व्याज दरात कपात करेल या शक्यतेमुळे कच्च्या तेलाच्या दराने काल मागच्या दोन आठवड्यातील उच्चांक गाठला. काल ब्रेंट क्रूड फ्युचर्सचे दर वाढून ६३ डॉलर आणि ७५ सेंट्स प्रती बॅरल झाले तर डब्ल्यूटीआय फ्युचर्सचे दर ६० डॉलर्स आणि ८ सेंट्स इतके वाढले.

**<><><><><>**

भारत आणि दक्षिण आफ्रिके दरम्यानच्या एकदिवसीय मालिकेतला तिसरा आणि शेवटचा सामना आज दुपारी विशाखापट्टणम इथं सुरू आहे. या मालिकेतला एक सामना भारताने तर एक सामना दक्षिण आफ्रिकेने जिंकल्यामुळे मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. दरम्यान, भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या एका षटकात एक खेळाडू बाद एक धाव झाली होती.

**<><><><><>**

पुरुषांच्या एफ आय एच ज्युनिअर विश्वचषक हॉकी स्पर्धेत भारतानं काल आपल्या पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या बेल्जीयमच्या संघाला पराभूत करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. चेन्नईमध्ये झालेल्या या सामन्यात खेळाची वेळ संपली तेव्हा दोन्ही संघ २-२ असे बरोबरीत होते. त्यानंतर झालेल्या पेनल्टी शूटआऊटमध्ये भारतीय संघानं बेल्जीयमच्या संघाला ४-३ असं पराभूत केलं. शरद नंद तिवारी यानं ३ गोल करत भारताची बाजू भक्कम केली तर अंकित पाल यानं निर्णायक गोल केला. प्रिन्सदीप यानं सामनावीराचा पुरस्कार पटकावला.  उपांत्य फेरीत उद्या भारताचा संघ ७ वेळा विजेतेपद मिळवणाऱ्या  जर्मनीच्या संघाला टक्कर देणार आहे.

**//<><><><><>//**